दैनिक
MAHILA SANVAD
# महिला संवाद
आवृत्ती : पुणे | PRGI Reg. No. - MHMAR/25/A1224 | इतर आवृत्ती : मुंबई - जालना- छत्रपती संभाजीनगर - सोलापूर - सातारा
संपादक : ज्योती मधुकर आडेकर | कार्यकारी संपादक : विद्या जाधव | उप संपादक : सौ. सुनंदा राजु निक्रड
PUNE : Volume No. 2, Issue No. 27, Marathi Daily Monday, Date - 31 August 2026 Price 2 Rupees, Pages - 4
पुणे अवृत्ती | वर्ष २ रे | अंक २७ वा | मराठी दैनिक | सोमवार दि. ३१ ऑगस्ट २०२६ | किंमत २ रुपये | पाने ४

**महिला प्रतिनिधी पाहिजेत**

जालना आणि पुणे येथून प्रकाशित होणारे महिला संवाद या मराठी वृत्तपत्रासाठी जिल्हा, तालुका आणि सर्कलसाठी महिला प्रतिनिधी पाहिजेत.

सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, राजकीय आणि भौगोलिक माहिती असणाऱ्यांनी खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

**महिला संवाद**

कार्यालय
दैनिक महिला संवाद,
गांधी चमन, सावित्रीबाई फुले चौक, जालना. 9168567111

**पाहिजेत**

महाराष्ट्रातील निर्भिड आणि निष्पक्ष दैनिक महिला संवाद या वृत्तपत्रासाठी पुणे जिल्ह्यातील सर्व तालुक्यात प्रतिनिधी पाहिजेत इच्छुकांनी खालील प्रत्यावर अथवा क्रमांकावर संपर्क साधावा.

अनंत पार्क काळेवाडी रोड राहटणी धनगर बाबा मंदिरा जवळ पुणे शहर पुणे-४३१००३
संपर्क - 9168567111
वरील क्रमांकावर बायोडाटा पाठवावा

# कनिष्ठ अभियंता परीक्षेतील गैरप्रकाराने खळबळ

## प्रश्नपत्रिका फुटल्याचा आरोप; १६९ नियुक्त्या रद्द करून फेरपरीक्षेची मागणी

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यातील विविध स्पर्धा आणि भरती परीक्षांमधील गैरप्रकारांच्या तक्रारींची मालिका सुरूच असताना आता पुणे महानगरपालिकेच्या कनिष्ठ अभियंता पदाच्या परीक्षेवरही गंभीर आरोप करण्यात आले आहेत. या परीक्षेत गैरप्रकार झाल्याचा आरोप शिवसेनेचे नगरसेवक नाना भानगिरे यांनी केला असून, प्रशासनातील एका मोठ्या व्यक्तीचा या प्रकरणात सहभाग असल्याचा दावा त्यांनी केला आहे.

कनिष्ठ अभियंता पदाची परीक्षा १६ जून रोजी घेण्यात आली होती. या परीक्षेत गैरप्रकार झाल्याचे त्याच वेळी निदर्शनास आले होते, असे नाना भानगिरे यांनी म्हटले आहे. पुणे महानगरपालिकेने परीक्षेदरम्यान तीन उमेदवारांनी गैरप्रकार केल्याचे मान्य केले होते, असा दावाही त्यांनी केला. मात्र, परीक्षा प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्यानंतरही पुणे महानगरपालिकेचे आयुक्त आणि अतिरिक्त आयुक्त यांनी तब्बल १६९ उमेदवारांची नियुक्ती कशी केली, असा सवाल भानगिरे यांनी उपस्थित केला आहे. परीक्षेचा प्रश्नपत्रिका आधीच बाहेर आल्याचा आरोपही त्यांनी केला असून, त्यामुळे करण्यात आलेल्या नियुक्त्या नियमबाह्य असल्याचा दावा केला आहे.

या पार्श्वभूमीवर १६९ उमेदवारांच्या नियुक्त्या तातडीने रद्द कराव्यात, तसेच संपूर्ण परीक्षा प्रक्रिया पुन्हा राबवून नव्याने परीक्षा घ्यावी, अशी मागणी नाना भानगिरे यांनी केली आहे. गैरप्रकारामुळे प्रामाणिकपणे परीक्षा देणाऱ्या उमेदवारांवर अन्याय झाला असून त्यांना न्याय मिळणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले आहे.




दरम्यान, देशभरात वैद्यकीय प्रवेश परीक्षेसह विविध परीक्षांमध्ये गैरप्रकारांच्या घटना समोर येत असताना राज्यातील भरती परीक्षांवरही प्रश्न उपस्थित होत आहेत. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेतील कथित गैरप्रकारानंतर मुंबई उच्च न्यायालयाच्या लिपिक पदाच्या परीक्षेवरही वाद निर्माण झाला होता.

उच्च न्यायालयाच्या लिपिक पदाच्या परीक्षेतील कथित गैरप्रकाराविरोधात राज्यातील विविध परीक्षा केंद्रांवर उमेदवारांनी निदर्शने केली होती. संभाजीनगरमधील परीक्षा केंद्रावरही विद्यार्थ्यांनी आंदोलन केले होते. या आंदोलनात सीजेपीचे अध्यक्ष अभिजीत दीपके सहभागी झाले होते. या प्रकरणानंतर उच्च न्यायालय प्रशासनाने परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतला असून नव्या परीक्षेची तारीख लवकरच जाहीर केली जाणार आहे.

आता पुणे महापालिकेच्या कनिष्ठ अभियंता परीक्षेतील आरोपांमुळे पुन्हा एकदा भरती प्रक्रियेतील पारदर्शकता आणि उमेदवारांच्या भवितव्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. मात्र, नाना भानगिरे यांनी केलेले आरोप स्वतंत्रपणे अधिकृत तपासातून सिद्ध होणे बाकी आहे.

# परभणीत संजय जाधवांच्या कार्यक्रमाबाहेर राडा

**परभणी । प्रतिनिधी**

परभणीतील खासदार संजय जाधव यांनी आयोजित केलेल्या शेतकरी मेळाव्यात गोंधळ झाल्याची घटना समोर आली आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी हा मेळावा रद्द करण्याची मागणी संजय जाधव यांच्याकडे केली होती. मात्र मेळावा रद्द न झाल्याने कार्यक्रमस्थळी काही आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी करत विरोध दर्शविला. त्यामुळे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.

परभणीतील या शेतकरी मेळाव्यासाठी जिल्ह्यासह आसपासच्या भागातून मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित झाले होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे देखील या कार्यक्रमाला उपस्थित होते. खासदार संजय जाधव भाषण करत असताना कार्यक्रमस्थळी उपस्थित असलेल्या काही जणांनी अचानक जोरदार घोषणाबाजी सुरू केली. त्यामुळे काही काळ गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली.

परिस्थिती अधिक चिघळण्यापूर्वी पोलिसांनी तातडीने हस्तक्षेप केला. घोषणाबाजी करणाऱ्या आंदोलकांना सभास्थळावरून बाहेर काढण्यात आले. पोलिसांच्या हस्तक्षेपानंतर परिस्थिती नियंत्रणात आली असून सध्या मेळाव्याच्या ठिकाणी वातावरण सामान्य असल्याची माहिती आहे.

दरम्यान, मेळावा रद्द करण्यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी संजय जाधव यांना दूरध्वनी केला होता. मेळावा रद्द करावा, अन्यथा आपण तेथे येऊ, असा इशारा त्यांनी दिल्याची माहिती समोर आली होती. मात्र मेळावा आधीच निश्चित असून त्याची गेल्या सुमारे १५ दिवसांपासून तयारी सुरू असल्याने आता तो रद्द करणे योग्य वाटत नसल्याचे संजय जाधव यांनी स्पष्ट केले.


# उच्च न्यायालयाच्या शिपाई भरती परीक्षेत मोबाइलचा वापर

**नाशिक । प्रतिनिधी**

मुंबई उच्च न्यायालयाच्या शिपाई पदाच्या भरती परीक्षेदरम्यान नाशिकमध्ये धक्कादायक प्रकार समोर आला. कॉलेज रोडवरील एस.एम.आर.के. महाविद्यालयातील परीक्षा केंद्रावर एका परीक्षार्थीने चक्क बुटात मोबाइल लपवून परीक्षा कक्षात प्रवेश केल्याचा प्रकार उघडकीस आला. प्रश्नपत्रिका मिळाल्यानंतर मोबाइलच्या माध्यमातून प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करत असताना पर्यवेक्षकांनी त्याला रंगेहाथ पकडले. याप्रकरणी ३० वर्षीय मनोज निवृत्ती वाघ याच्याविरुद्ध गंगापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नाशिकरोड येथील सह दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तराचे सहायक अधीक्षक तुषार वडघुले आणि प्राध्यापक सौरभ देशपांडे हे एस.एम.आर.के. महाविद्यालयातील परीक्षा केंद्रावर पर्यवेक्षक म्हणून कर्तव्य बजावत होते. परीक्षा सुरू असताना मनोज वाघ याच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने पर्यवेक्षकांनी त्याच्यावर लक्ष ठेवले.

तपासणी केली असता परीक्षा कक्षात मोबाइल नेण्यास स्पष्ट मनाई असतानाही त्याने मोबाइल लपवून आणल्याचे समोर आले. विशेष म्हणजे, मोबाइल बुटात लपवून परीक्षा केंद्रात आणण्यात आला होता. प्रश्नपत्रिका मिळाल्यानंतर त्याने मोबाइलच्या माध्यमातून गुगलवर प्रश्नांची उत्तरे शोधण्यास सुरुवात केल्याचे




पर्यवेक्षकांच्या निदर्शनास आले.

हॉल क्रमांक ११ मध्ये सुरू असलेल्या या प्रकारामुळे परीक्षा केंद्रावर एकच खळबळ उडाली. पर्यवेक्षकांनी तत्काळ मोबाइल ताब्यात घेत मनोज वाघला पकडले. त्यानंतर सहायक अधीक्षक तुषार वडघुले यांनी सरकारतर्फे २७ ऑगस्ट रोजी गंगापूर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीच्या आधारे गंगापूर पोलिसांनी मनोज वाघ याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवला असून या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

उच्च न्यायालयाच्या भरती परीक्षेत कडक तपासणीची व्यवस्था असतानाही बुटात मोबाइल लपवून परीक्षार्थीने प्रवेश केल्याने परीक्षा व्यवस्थेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# १२ दिवस हाउस अरेस्ट करून ९० लाख उकळले

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिकमध्ये सायबर गुन्हेगारांनी एटीएस आणि मुंबई पोलिसांचे अधिकारी असल्याचे भासवून एका खासगी कंपनीच्या अधिकाऱ्याला तब्बल ९० लाख रुपयांचा गंडा घातला. दहशतवादाशी संबंधित प्रकरणात बँक खात्यांचा संबंध असल्याची भीती दाखवत गुन्हेगारांनी अधिकाऱ्याला तब्बल १२ दिवस घरातच हाउस अरेस्ट करून ठेवले. या काळात व्हॉट्सॲपच्या माध्यमातून सतत संपर्कात राहून त्याच्याकडून पैसे उकळण्यात आले.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित अधिकाऱ्याला एका अनोळखी क्रमांकावरून फोन आला. फोन करणाऱ्यांनी स्वतःची ओळख एटीएसचे अधिकारी म्हणून करून दिली. जम्मू-काश्मीरमध्ये संबंधित अधिकाऱ्याच्या आधारकार्डचा वापर करून काही बँक खाती उघडण्यात आल्याचा दावा त्यांनी केला.

या खात्यांचा वापर दहशतवाद्यांकडून मनी लॉण्डरिंगसाठी करण्यात आल्याचा संशय असल्याचे सांगून गुन्हेगारांनी अधिकाऱ्याला धक्कादायक माहिती दिली. त्याच्या बँक खात्याचाही या प्रकरणाशी संबंध जोडला जाऊ शकतो, अशी भीती निर्माण करण्यात आली. तपास पूर्ण होईपर्यंत त्याला ताब्यात घेण्यात येत असल्याचे सांगत घराबाहेर न पडण्याचे आदेश देण्यात आले. त्यानंतर तब्बल १२ दिवस गुन्हेगारांनी चार वेगवेगळ्या मोबाइल क्रमांकांवरून अधिकाऱ्याशी व्हॉट्सॲपच्या माध्यमातून संपर्क ठेवला. या काळात त्याच्यावर सतत मानसिक दबाव निर्माण करण्यात आला. बँक खात्यातील रकमेची रिझर्व्ह बँकेमार्फत तपासणी करायची असल्याचे सांगण्यात आले.

यासाठी खात्यातील पैसे



तीन वेगवेगळ्या बँक खात्यांमध्ये आरटीजीएसद्वारे पाठवण्याचे आदेश देण्यात आले. सरकारी यंत्रणेचे अधिकारी असल्याचा विश्वास बसल्याने आणि दहशतवादाच्या प्रकरणात अडकण्याची भीती निर्माण झाल्याने पीडित अधिकाऱ्याने गुन्हेगारांच्या सूचनेनुसार पैसे हस्तांतरित केले.

अशा प्रकारे आरोपींनी तब्बल ९० लाख रुपये उकळले. विशेष म्हणजे या संपूर्ण फसवणुकीत आरोपींनी पीडित अधिकाऱ्याची प्रत्यक्ष भेट घेतली नाही. फोन कॉल आणि व्हॉट्सॲपच्या माध्यमातूनच त्याच्यावर दबाव टाकण्यात आला. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर संबंधित अधिकाऱ्याने पोलिसांकडे धाव घेतली. नाशिक पोलिसांनी या प्रकरणाची दखल घेत तपास सुरू केला आहे. आरोपींनी वापरलेले मोबाइल क्रमांक, बँक खाती आणि पैशांच्या व्यवहारांची माहिती पोलिसांकडून तपासली जात आहे. दरम्यान, सरकारी यंत्रणांच्या नावाने येणाऱ्या अशा फोन कॉलपासून नागरिकांनी सावध राहण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात येत आहे. कोणताही सरकारी अधिकारी फोनवरून बँक खात्यातील पैसे दुसऱ्या खात्यात जमा करण्यास सांगत नाही. त्यामुळे एटीएस, पोलिस, रिझर्व्ह बँक किंवा अन्य कोणत्याही सरकारी संस्थेच्या नावाने पैशांची मागणी झाल्यास तातडीने संबंधित यंत्रणेशी संपर्क साधावा.

**जाहीर प्रगटन**
**दैनिक महिला संवाद**
मध्ये छोट्या जाहिराती आणि पॅनल जाहिराती
फक्त 300 रुपयात
प्रसिद्ध करण्यात येतील :
- जाहीर प्रगटन
- पाहिजेत / पाहिजे
- जन्मतारीख बदल
- नावात बदल
- मालमत्ता हस्तांतरण
- खरेदी-विक्री
- स्वरूपाच्या यासंबंधी छोटया जाहिराती

दैनिक महिला संवाद
आपला विश्वास, आमची जबाबदारी

जाहिराती केवळ 300 रुपयात प्रसिद्ध केल्या जातील.
इच्छुकांनी आजच या नंबरवर संपर्क साधावा.
9168567111

# तीन कारची शर्यत जीवघेणी ठरली; जपानी गार्डन रोडवर पादचाऱ्याचा बळी

**नागपूर । प्रतिनिधी**

नागपुरात रविवारी भल्या पहाटे जपानी गार्डन रोडवर भीषण अपघाताची घटना घडली. भरधाव वेगाने धावणाऱ्या तीन कारपैकी एका कारने गार्डनच्या भिंतीला जोरदार धडक दिली. त्यानंतर ही कार रस्त्यावरून मॉर्निंग वॉक करत असलेल्या एका ज्येष्ठ नागरिकाला धडकली. या अपघातात कैलास सनोडिया यांचा जागीच मृत्यू झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी पहाटे तीन कार भरधाव वेगाने जात होत्या. त्यापैकी एका कारवरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने कार जपानी गार्डनच्या भिंतीवर जाऊन आदळली. त्यानंतर कारने रस्त्यावरून चालत असलेल्या कैलास सनोडिया यांना जोरदार धडक दिली. यात त्यांचा जागीच मृत्यू झाला.

अपघातानंतर दोन कार घटनास्थळावरून भरधाव वेगाने निघून गेल्या. मात्र, अपघात झालेली कार घटनास्थळीच राहिली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतले असून, एका व्यक्तीचा कारमध्ये अडकल्याचेही दिसून आले.

अपघातावेळी कारमधील व्यक्तींनी मद्यपान केले होते का, याचा तपास पोलिसांकडून करण्यात येत आहे. तसेच तिन्ही कारमध्ये शर्यत सुरू होती का, याचीही शक्यता तपासली जात आहे. भरधाव वेगामुळे हा भीषण अपघात घडल्याचा प्राथमिक अंदाज आहे. या घटनेमुळे परिसरात काही काळ खळबळ उडाली. पहाटे मॉर्निंग वॉकसाठी घराबाहेर पडलेल्या ज्येष्ठ नागरिकाचा अशा प्रकारे जीव गेल्याने नागरिकांकडून हळहळ व्यक्त केली जात आहे.



### ट्रकच्या केबिनमध्ये स्वयंपाक करताना आग; सावनेरजवळ थरार

नागपूर जिल्ह्यातील सावनेर परिसरात ट्रकच्या केबिनमध्ये स्वयंपाक करत असताना अचानक आग लागल्याची घटना घडली. भगेमाहिरी टोल नाक्याजवळ शनिवारी रात्री साडेअकराच्या सुमारास ही घटना घडली. काही क्षणांतच आगीने संपूर्ण केबिनला वेढा दिल्याने ट्रकचे मोठे नुकसान झाले.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित ट्रक झारखंडहून भोपाळच्या दिशेने जात होता. भगेमाहिरी टोल नाक्याजवळ चालकाने ट्रक थांबवला होता. यावेळी ट्रकच्या केबिनमध्ये स्वयंपाक सुरू असतानाच अचानक आग लागली. आगीने काही क्षणांतच रौद्ररूप धारण केले. केबिनमधून मोठ्या प्रमाणात धूर आणि ज्वाळा बाहेर येत असल्याने परिसरात खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले. अग्निशमन दलाच्या जवानांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत आगीवर नियंत्रण मिळवले. जवानांच्या तत्परतेमुळे मोठा अनर्थ टळला. या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. मात्र, आगीत ट्रकच्या केबिनचे मोठे नुकसान झाले आहे. दरम्यान, ट्रकच्या केबिनमध्ये स्वयंपाक करताना आग लागण्याच्या घटना यापूर्वीही घडल्या आहेत. त्यामुळे वाहनचालकांनी ट्रकमध्ये स्वयंपाक करताना विशेष काळजी घेण्याचे आणि शक्यतो केबिनमध्ये स्वयंपाक न करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

## थोडक्यात...

### दीड दिवसाची शाळा शिकून अण्णाभाऊंनी जगाला ज्ञानामृत पाजले - किसनराव मोरे



**मंठा । प्रतिनिधी**

तालुक्यातील आंभोरा येथे दि.२९ ऑगस्ट रोजी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमात बोलताना किसनराव मोरे यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याचा गौरव केला. दीड दिवसाची शाळा शिकून अण्णाभाऊंनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून संपूर्ण जगाला ज्ञानामृत पाजले, असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस किसनराव मोरे यांच्या सह मान्यवरांच्या हस्ते अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डी ई नामवाड हे होते. तर शिवसेना उपजिल्हाप्रमुख किसनराव मोरे,ॲड. विलास दादा साबळे (संस्थापक अध्यक्ष मातंग युथ फेडरेशन) डी ई नामवाड,किसनराव मोरे ॲड.सुरेश खंदारे, प्रा.मुरलीधर घोडे,विनायक बाहेकर,विष्णुपंत बाहेकर आत्माराम साळवे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी अण्णाभाऊंच्या साहित्यिक व सामाजिक कार्याला उजाळा देत त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प केला.

यावेळी बोलतांना किसनराव मोरे यांनी अण्णाभाऊ साठे हे केवळ साहित्यिक नव्हते, तर ते कष्टकरी, शोषित, वंचित आणि उपेक्षित समाजाच्या वेदनांना आपल्या लेखणीतून आवाज देणारे महान लोकशाहीर होते. प्रतिकूल परिस्थितीत शिक्षणाची संधी न मिळूनही त्यांनी आपल्या अनुभवाच्या आणि प्रतिभेच्या जोरावर मराठी साहित्यविश्वात अढळ स्थान निर्माण केले. त्यांच्या साहित्यामध्ये सामाजिक विषमता, अन्याय, गरिबी आणि शोषणाविरोधातील संघर्षाचे प्रभावी चित्रण आढळते.

अण्णाभाऊंच्या कथा, कादंबऱ्या, पोवाडे, लावण्या आणि लोकनाट्यांनी समाजप्रबोधनाचे मोठे कार्य केले. 'फकिरा' या कादंबरीतून त्यांनी अन्यायाविरुद्धचा संघर्ष आणि स्वाभिमानाची भावना प्रभावीपणे मांडली. कष्टकरी माणसाच्या जीवनाला साहित्याच्या केंद्रस्थानी आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य अण्णाभाऊंनी केले असे सांगितले.आजच्या तरुण पिढीने अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा आदर्श घेऊन सामाजिक समता, बंधुता आणि न्यायासाठी कार्य करावे, असे आवाहनही किसनराव मोरे यांनी यावेळी केले. सरपंच,उपसरपंच व सर्व ग्रामपंचायत सदस्य व तसेच महिला व नागरिक उपस्थित होते. दरम्यान लहू वंदनेने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# संपादकीय...

## संशय भरती प्रक्रियेवर!

राज्यात स्पर्धा आणि भरती परीक्षांमधील कथित गैरप्रकारांची मालिका थांबण्याचे नाव घेत नाही. एका परीक्षेतील वाद शांत होण्यापूर्वी दुसऱ्या परीक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. आता पुणे महानगरपालिकेच्या कनिष्ठ अभियंता पदाच्या परीक्षेबाबत करण्यात आलेले आरोप हे केवळ एका परीक्षेपुरते मर्यादित नसून संपूर्ण भरती प्रक्रियेच्या विश्वासार्हतेसमोर उभे राहिलेले गंभीर आव्हान आहे. कनिष्ठ अभियंता पदाची परीक्षा झाल्यानंतर गैरप्रकार झाल्याचे आरोप झाले. काही उमेदवारांनी गैरप्रकार केल्याचे प्रशासनाने मान्य केले असल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यानंतरही १६९ उमेदवारांची नियुक्ती करण्यात आली असेल, तर या प्रक्रियेबाबत अनेक प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे. विशेषतः प्रश्नपत्रिका आधीच बाहेर आल्याचा आरोप असेल, तर त्याची स्वतंत्र आणि निष्पक्ष चौकशी होणे अत्यावश्यक आहे भरती परीक्षेत सहभागी होणारा प्रत्येक विद्यार्थी अनेक वर्षे मेहनत घेतो. आर्थिक अडचणी, कौटुंबिक परिस्थिती आणि मानसिक ताण सहन करत तो एका संधीची वाट पाहत असतो. अशा वेळी परीक्षेतील गैरप्रकाराची शंका जरी निर्माण झाली, तरी प्रामाणिक उमेदवारांच्या मनात व्यवस्थेविषयी अविश्वास निर्माण होतो. 'मेहनत करूनही न्याय मिळणार नसेल तर अभ्यास कशासाठी?' हा प्रश्न तरुणांच्या मनात निर्माण होणे ही कोणत्याही सरकारसाठी चिंतेची बाब आहे. मात्र, आरोप झाले म्हणजे ते सत्य ठरतात असेही नाही. त्यामुळे आरोप करणाऱ्यांचे म्हणणे आणि प्रशासनाची बाजू या दोन्हींची निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक आहे. चौकशीपूर्वी कोणालाही दोषी ठरवणे योग्य नाही; परंतु आरोपांकडे दुर्लक्ष करणे त्याहून धोकादायक आहे. परीक्षा प्रक्रियेतील प्रत्येक टप्पा पारदर्शक असला पाहिजे. प्रश्नपत्रिका तयार करण्यापासून परीक्षा केंद्र, सीसीटीव्ही, प्रश्नपत्रिकेची वाहतूक, उत्तरपत्रिकांची तपासणी आणि निकालापर्यंत संपूर्ण प्रक्रियेचे स्वतंत्र ऑडिट झाले पाहिजे. गैरप्रकार सिद्ध झाल्यास दोषींवर कठोर कारवाई झालीच पाहिजे आणि प्रामाणिक उमेदवारांना न्याय देण्यासाठी आवश्यक तो निर्णय घेतला पाहिजे. परीक्षा ही केवळ नोकरी मिळवण्याची प्रक्रिया नाही; ती तरुणांच्या भवितव्याशी जोडलेली व्यवस्था आहे. त्यामुळे भरती प्रक्रियेवरील विश्वास ढासळणे म्हणजे हजारो तरुणांच्या भवितव्यावर परिणाम होणे होय. सरकार आणि संबंधित प्रशासनाने आता केवळ स्पष्टीकरण देण्यापेक्षा विश्वास निर्माण करणारी कृती करणे गरजेचे आहे. गैरप्रकार झाला नसेल तर ते ठोस पुराव्यांसह स्पष्ट करावे आणि झाला असेल तर दोषींना वाचवू नये. कारण प्रश्न १६९ नियुक्त्यांचा नाही; प्रश्न आहे तो मेहनत करणाऱ्या प्रत्येक तरुणाच्या विश्वासाचा.

# नवे शैक्षणिक धोरणातील उद्योजकीय शिक्षण आणि वास्तव!

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० लागू होऊन आता काही वर्षे झाली आहेत. या धोरणाने भारतीय शिक्षणव्यवस्थेसमोर एक व्यापक आणि महत्त्वाकांक्षी दिशा ठेवली. पाठांतर आणि केवळ पदवी मिळविण्यापेक्षा कौशल्य, सर्जनशीलता, चिकित्सक विचार, बहुविषयक शिक्षण, व्यावसायिक शिक्षण, तंत्रज्ञान, संशोधन आणि उद्योजकता यांना शिक्षणाच्या केंद्रस्थानी आणण्याचा प्रयत्न झाला. त्यामुळे शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. मात्र धोरणातील संकल्पना आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी यांच्यामध्ये नेहमीच काही अंतर असते. आज राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीचा अनुभव घेताना हे अंतर अधिक स्पष्टपणे जाणवते. धोरणाची दिशा महत्त्वाची आहे; परंतु त्या दिशेने प्रत्यक्ष प्रवास किती झाला, विद्यार्थ्यांच्या अनुभवात काय बदल झाला आणि शिक्षणसंस्थांना कोणत्या अडचणी येत आहेत, याचे मूल्यमापन करणे आता आवश्यक आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने कौशल्याधारित शिक्षणाला महत्त्वाचे स्थान दिले आहे. शालेय स्तरापासून व्यावसायिक शिक्षणाशी विद्यार्थ्यांची ओळख व्हावी, अनुभवातून शिकण्याची संधी मिळावी आणि शिक्षणाचा संबंध प्रत्यक्ष जीवनाशी जोडला जावा, अशी अपेक्षा आहे. महाविद्यालयीन स्तरावरही कौशल्य अभ्यासक्रम, इंटर्नशिप, उद्योगाशी संबंध, बहुविषयक शिक्षण आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न केला जात आहे. परंतु प्रत्यक्ष परिस्थितीत कौशल्य शिक्षणाचा विस्तार झाला असला तरी त्याची गुणवत्ता आणि परिणामकारकता सर्व संस्थांमध्ये समान नाही. एखादा कौशल्यविषय अभ्यासक्रमात समाविष्ट करणे ही सुरुवात आहे; त्यासाठी प्रशिक्षित शिक्षक, प्रयोगशाळा, साधने, उद्योगाशी संपर्क, प्रत्यक्ष प्रशिक्षण आणि मूल्यमापनाची योग्य पद्धत आवश्यक आहे. या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर कौशल्य शिक्षण पुन्हा सैद्धांतिक शिक्षणापुरते मर्यादित होण्याची शक्यता असते. याच ठिकाणी शिक्षण आणि रोजगार यांच्यातील अंतराचा प्रश्न उभा राहतो. उद्योगाला ज्या कौशल्यांची आवश्यकता आहे तीच कौशल्ये विद्यार्थ्यांमध्ये विकसित होत आहेत का, हा मूलभूत प्रश्न आहे. नोकरीच्या जाहिरातीत मागितली जाणारी कौशल्ये आणि विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष प्रशिक्षणामध्ये तफावत राहिली तर पदवी, प्रमाणपत्र किंवा कौशल्य अभ्यासक्रम यांचा अपेक्षित रोजगारपरिणाम मिळणार नाही. त्यामुळे अभ्यासक्रम तयार करताना उद्योगविश्वाशी सातत्याने संवाद ठेवणे गरजेचे आहे.

उद्योजकतेच्या बाबतीतही अशीच परिस्थिती आहे. विद्यार्थ्यांना उद्योजकतेची ओळख करून देणे, व्यवसायकल्पना तयार करायला शिकवणे आणि व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक परिसंस्था निर्माण करणे या तीन वेगळ्या पायऱ्या आहेत. शिक्षणसंस्थांमध्ये उद्योजकता विकासाचे उपक्रम वाढत आहेत; परंतु विद्यार्थ्यांच्या कल्पनेपासून प्रत्यक्ष उद्योग उभारणीपर्यंतचा प्रवास अजूनही मर्यादित आहे. भांडवल, बाजारपेठ, मार्गदर्शन, तंत्रज्ञान, व्यवसाय नोंदणी, आर्थिक नियोजन आणि ग्राहकांपर्यंत पोहोच या बाबींमध्ये विद्यार्थ्यांना सातत्यपूर्ण मदत मिळणे आवश्यक आहे. बहुविषयक शिक्षण ही राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची आणखी एक महत्त्वाची संकल्पना आहे. कला, वाणिज्य आणि विज्ञान यांच्यातील पारंपरिक भिंती कमी करून विद्यार्थ्यांना विविध विषय निवडण्याची संधी देण्यामागे ज्ञानाचा व्यापक विकास हा उद्देश आहे. ही कल्पना विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेसाठी उपयुक्त आहे. मात्र प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी प्रत्येक महाविद्यालयाकडे पुरेसे शिक्षक, विविध विषयांची उपलब्धता, वेळापत्रकातील लवचिकता आणि आवश्यक प्रशासकीय व्यवस्था असणे गरजेचे आहे.

Multiple Entry-Exit, -cademic Bank of Credits आणि विविध टप्प्यांवर प्रमाणपत्र किंवा पदविका मिळण्याची व्यवस्था विद्यार्थ्यांना लवचिकता देऊ शकते. शिक्षणामध्ये खंड पडलेल्या विद्यार्थ्याला पुन्हा शिक्षणात येण्याचा मार्ग उपलब्ध होणे ही सकारात्मक बाब आहे. परंतु या व्यवस्थेचा खरा फायदा तेव्हाच होईल जेव्हा प्रत्येक टप्प्यावर मिळणाऱ्या पात्रतेला रोजगार आणि पुढील शिक्षणाच्या दृष्टीने स्पष्ट मूल्य असेल.

शिक्षक हा या संपूर्ण परिवर्तनाचा केंद्रबिंदू आहे. नवीन अभ्यासक्रम, नवीन मूल्यमापन पद्धती, डिजिटल साधने, कौशल्याधारित शिक्षण, बहुविषयकता आणि विद्यार्थिकेंद्रित अध्यापन या सर्वांची अंमलबजावणी शिक्षकांमार्फतच होणार आहे. त्यामुळे शिक्षकांना प्रशिक्षण, वेळ, साधने आणि शैक्षणिक स्वायत्तता मिळणे अत्यावश्यक आहे. शिक्षकांवर नवीन जबाबदाऱ्या वाढवून त्यांना आवश्यक साधने उपलब्ध करून न दिल्यास धोरणाची अपेक्षित परिणामकारकता कमी होऊ शकते. शिक्षणसंस्थांच्या पातळीवरही बदलांची गुंतागुंत वाढली आहे. नवीन अभ्यासक्रम, श्रेयांक व्यवस्था, कौशल्य विषय, इंटर्नशिप, डिजिटल नोंदी, विविध प्रवेश-निर्गमन व्यवस्था आणि प्रशासकीय प्रक्रिया यांची सांगड घालावी लागत आहे. मोठ्या संस्थांना काही सुविधा सहज उपलब्ध होऊ शकतात; परंतु ग्रामीण आणि लहान महाविद्यालयांसमोर मनुष्यबळ, आर्थिक साधने आणि पायाभूत सुविधांची आव्हाने अधिक असू शकतात. त्यामुळे 'एकच धोरण, एकसारखी अंमलबजावणी' हा दृष्टिकोन पुरेसा ठरणार नाही.

मातृभाषा आणि भारतीय भाषांमध्ये शिक्षणाला दिलेले महत्त्वही स्वागतार्ह आहे. परंतु उच्च दर्जाचे पाठ्यसाहित्य, डिजिटल सामग्री, संदर्भग्रंथ आणि तांत्रिक ज्ञान भारतीय भाषांमध्ये मोठ्या प्रमाणावर उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. भाषा ही केवळ अध्यापनाची माध्यमे नसून ज्ञाननिर्मितीचे माध्यम बनली पाहिजे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची खरी कसोटी धोरणाच्या दस्तऐवजात नाही, तर विद्यार्थ्यांच्या अनुभवात आहे. विद्यार्थ्याला अधिक चांगले शिकता येते का? त्याला आपल्या आवडीचे विषय निवडता येतात का? त्याच्यात प्रत्यक्ष कौशल्य विकसित होते का? तो समस्या सोडवू शकतो का? त्याला रोजगारासाठी आवश्यक क्षमता मिळते का? आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे तो स्वतःचा रोजगार निर्माण करण्याचा आत्मविश्वास मिळवतो का? या प्रश्नांची उत्तरेच धोरणाच्या यशाचे खरे मापदंड ठरतील.



भारताला मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण करणारी अर्थव्यवस्था घडवायची असेल तर शिक्षण आणि उद्योजकता यांची सांगड अधिक मजबूत करावी लागेल. विद्यार्थ्यांना केवळ नोकरीसाठी तयार करण्याऐवजी समस्या ओळखून त्यावर उपाय शोधणारे, नवकल्पना करणारे आणि संधी निर्माण करणारे नागरिक घडवावे लागतील. त्यासाठी शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, उद्योग, सरकार आणि समाज यांच्यात अधिक प्रभावी सहकार्य आवश्यक आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०ने दिशा निश्चित केली आहे. आता त्या दिशेने प्रत्यक्ष प्रवासाची गुणवत्ता महत्त्वाची आहे. धोरणात कौशल्य आहे, उद्योजकता आहे, लवचिकता आहे, बहुविषयकता आहे आणि अनुभवाधारित शिक्षणाची संकल्पना आहे. वास्तवात या संकल्पनांना पुरेसे शिक्षक, साधने, उद्योगसहकार्य, प्रशिक्षण, आर्थिक पाठबळ आणि प्रभावी व्यवस्थापन मिळणे आवश्यक आहे. म्हणून आजचा प्रश्न 'नवे शैक्षणिक धोरण चांगले आहे की नाही?' एवढाच नाही. खरा प्रश्न आहे- धोरणातील चांगल्या कल्पना विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष शिक्षणात किती उतरल्या आहेत?

धोरणाने परिवर्तनाची दारे उघडली आहेत. आता त्या दारातून विद्यार्थ्यांना पुढे नेण्याची जबाबदारी शिक्षणव्यवस्था, उद्योग, शासन आणि समाजाची आहे. धोरण आणि वास्तव यांच्यातील अंतर कमी झाले, तरच कौशल्यवान, आत्मविश्वासपूर्ण आणि उद्योजक तरुणाईच्या माध्यमातून भारताच्या विकासाला अपेक्षित वेग मिळेल.

**डॉ. भारत कऱ्हाड,**
प्राचार्य, वराडकर महाविद्यालय,
दापोली, जिल्हा रत्नागिरी.

# सहा महिन्यांपूर्वी एक्सपायर झालेले अन्न विद्यार्थ्यांना? अभिजीत दिपके आक्रमक

**हिंगोली । प्रतिनिधी**

केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर अभिजीत दिपके यांनी आता जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे मोर्चा वळवला आहे. हिंगोली जिल्ह्यातील विविध जिल्हा परिषद शाळांची पाहणी करताना दिपके यांनी शाळांमधील विद्यार्थ्यांना मिळणारे अन्न, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह आणि वर्गखोल्यांच्या व्यवस्थेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले.

हिंगोली जिल्ह्यातील एका जिल्हा परिषद शाळेची पाहणी करताना विद्यार्थ्यांना मुदत संपलेले अन्न दिले जात असल्याचा दावा अभिजीत दिपके यांनी केला. त्यांच्या म्हणण्यानुसार, संबंधित खाद्यपदार्थांची मुदत फेब्रुवारीमध्येच संपली होती. असे असतानाही ते विद्यार्थ्यांना दिले जात असल्याचा आरोप त्यांनी केला.

शाळेतील परिस्थिती पाहिल्यानंतर दिपके यांनी संबंधित अधिकाऱ्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधला. विद्यार्थ्यांना सहा महिन्यांपूर्वी मुदत संपलेले अन्न दिले जात असल्याचा आरोप त्यांनी अधिकाऱ्यांसमोर केला. तसेच शाळेत पाण्याची योग्य व्यवस्था नसल्याचा मुद्दाही त्यांनी उपस्थित केला.

शाळेत पिण्याच्या पाण्यासाठी गाळणीची व्यवस्था नसून बोअरचे पाणी विद्यार्थ्यांना प्यावे लागत असल्याचे दिपके यांनी सांगितले. त्याचबरोबर स्वच्छतागृहातही पाण्याची सुविधा नसल्याचा दावा त्यांनी केला. विद्यार्थ्यांशी चुकीच्या पद्धतीने व्यवहार केला जात असल्याचा आरोपही त्यांनी केला.

विशेष म्हणजे, संबंधित शाळेत ८७ विद्यार्थ्यांसाठी केवळ दोन वर्गखोल्या असल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी उपलब्ध असलेल्या मूलभूत सुविधांवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. अभिजीत दिपके यांनी हिंगोली जिल्ह्यातील वेगवेगळ्या शाळांना भेटी देत तेथील परिस्थितीची पाहणी सुरू केली




आहे. सरकारी शाळांमधील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणासोबतच सुरक्षित अन्न, स्वच्छ पाणी आणि मूलभूत सुविधा मिळणे आवश्यक असल्याचे सांगत त्यांनी प्रशासनाला जाब विचारला आहे.

दरम्यान, अभिजीत दिपके यांनी यापूर्वी नीट परीक्षेतील कथित पेपरफुटीच्या मुद्द्यावर मोठे आंदोलन केले होते. दिल्लीतील जंतरमंतरसह विविध ठिकाणी विद्यार्थ्यांनी आंदोलनात सहभाग घेतला होता. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणीही करण्यात आली होती.

आता केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्यानंतर दिपके यांनी आपला मोर्चा सरकारी शाळांमधील विद्यार्थ्यांच्या मूलभूत प्रश्नांकडे वळवला आहे. हिंगोलीतील शाळांच्या पाहणीदरम्यान त्यांनी केलेल्या आरोपांमुळे जिल्हा परिषद शाळांमधील सुविधा आणि विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या अन्नाच्या गुणवत्तेचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे. मात्र, एक्सपायरी झालेल्या अन्नाबाबत करण्यात आलेल्या आरोपांची अधिकृत पातळीवर पुष्टी होणे बाकी असून, संबंधित विभागाच्या तपासानंतरच या दाव्यांमागील वस्तुस्थिती स्पष्ट होणार आहे.



## थोडक्यात

### ५६ किलोमीटर परिसरात डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानचे स्वच्छता अभियान



**रायगड । प्रतिनिधी**

गौरी-गणपती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर रेवदंडा शहर आणि परिसरात स्वच्छतेचा एक आगळावेगळा आदर्श उभा राहताना दिसत आहे. पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी आणि डॉ. सचिनदादा धर्माधिकारी यांच्या प्रेरणेतून डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे राबविण्यात आलेल्या भव्य स्वच्छता अभियानात तब्बल १,२१० श्रीसदस्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत एकाच दिवशी ५२.२ टन कचरा गोळा करून परिसराला नवसंजीवनी दिली.

या अभियानाअंतर्गत साळाव चेकपोस्ट ते अलिबाग या दुतर्फा मुख्य रस्त्यावरील ५३ किलोमीटर परिसरासह रेवदंडा शहरातील अंतर्गत रस्ते, गल्ली, आळ्या, सार्वजनिक ठिकाणे, स्मशानभूमी आणि सुमारे ३ किलोमीटर समुद्रकिनारा स्वच्छ करण्यात आला. पहाटेपासूनच हजारो श्रीसदस्य हातात झाडू, फावडे, पाट्या आणि स्वच्छता साहित्य घेऊन मैदानात उतरले. काही तासांतच रस्त्यांच्या कडेला साचलेला कचरा, प्लास्टिक, झुडपे आणि अन्य घाण हटवून परिसर स्वच्छ, सुंदर आणि प्रसन्न करण्यात आला.

गौरी-गणपती हा महाराष्ट्रापुरता मर्यादित नसून संपूर्ण देशात उत्साहाने साजरा होणारा सण आहे. अशा महत्त्वाच्या सणापूर्वी रेवदंड्यातून स्वच्छतेच्या या महाअभियानाची झालेली सुरुवात नागरिकांच्या आनंदात भर घालणारी ठरली आहे. स्वच्छ रस्ते, झगमगणाऱ्या गल्ल्या, नीटनेटका समुद्रकिनारा आणि स्वच्छ सार्वजनिक ठिकाणांमुळे रेवदंड्याचा चेहरामोहरा अक्षरशः बदलून गेला आहे. यामुळे स्थानिक नागरिकांसह पर्यटकांनाही सुखद अनुभव मिळत आहे.विशेष म्हणजे, या अभियानात केवळ प्रतिष्ठानचे श्रीसदस्यच नव्हे तर अनेक स्थानिक नागरिकांनीही आपल्या परीने हातभार लावला. आपला परिसर स्वच्छ ठेवणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे, या भावनेतून नागरिकांनी स्वच्छता मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. परिणामी रेवदंडा परिसर अधिक आकर्षक, आरोग्यदायी आणि पर्यावरणपूरक बनल्याचे चित्र पाहायला मिळाले.गोळा करण्यात आलेल्या ५२.२ टन कचऱ्याचे योग्य प्रकारे वर्गीकरण करून त्याची शास्त्रोक्त विल्हेवाट लावण्यात आली. त्यामुळे स्वच्छतेबरोबरच पर्यावरण संवर्धनाचाही महत्त्वपूर्ण संदेश या उपक्रमातून देण्यात आला.डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानचे कार्य केवळ स्वच्छता अभियानापुरते मर्यादित नाही. वृक्षलागवड व संवर्धन, व्यसनमुक्ती, प्रौढ साक्षरता, अंधश्रद्धा निर्मूलन, पर्यावरण संरक्षण आणि समाजप्रबोधन अशा विविध क्षेत्रांत प्रतिष्ठान सातत्याने उल्लेखनीय कार्य करत आहे. 'स्वच्छतेतून समृद्धी' आणि 'सेवेतून समाजपरिवर्तन' हा संदेश प्रतिष्ठानने कृतीतून समाजासमोर ठेवला आहे.

या भव्य उपक्रमानंतर रेवदंडा परिसरातील नागरिकांमध्ये एकच चर्चा रंगली होती-डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानचे आम्ही कायम ऋणी आहोत. हजारो हातांच्या श्रमदानातून उभी राहिलेली ही स्वच्छतेची चळवळ आता केवळ एका दिवसाचा कार्यक्रम न राहता जनजागृतीचे प्रभावी आंदोलन ठरत असल्याचे मत नागरिक व्यक्त करत आहेत. गौरी-गणपतीच्या स्वागतासाठी सजलेल्या रेवदंड्यात स्वच्छता, शिस्त आणि सामाजिक बांधिलकीचा हा आदर्श उपक्रम सर्वत्र कौतुकाचा विषय ठरला आहे.

# दोन महिन्यांच्या गरोदर प्रेयसीचा विष देऊन जीव घेतला; प्रियकराचा कट उघड

**मुंबई । प्रतिनिधी**

चारित्र्यावर संशय घेत दोन ते अडीच महिन्यांच्या गरोदर प्रेयसीची विष देऊन हत्या केल्याचा धक्कादायक प्रकार मुंबईत समोर आला आहे. आशिष मगर असे आरोपी प्रियकराचे नाव असून आरसीएफ पोलिसांनी त्याला अटक केली आहे. या प्रकरणात आरोपीने हत्येचा कट आधीच रचल्याचे तपासात समोर आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, २५ तारखेला आशिष आणि त्याच्या प्रेयसीमध्ये वाद झाला होता. वाद शांत झाल्यानंतर आशिषने प्रेयसीला शीतपेय प्यायला दिले. त्या शीतपेयात विषारी पदार्थ मिसळल्याची कोणतीही कल्पना तिला नव्हती. शीतपेय प्यायल्यानंतर काही वेळातच तिची प्रकृती बिघडली. तिला उलट्या होऊ लागल्या आणि मोठ्या प्रमाणात त्रास जाणवू लागला.

सुरुवातीला कुटुंबीयांनी तिच्या प्रकृतीकडे फारसे गांभीर्याने पाहिले नाही. मात्र, त्रास वाढल्यानंतर ती चक्कर येऊन खाली पडली. त्यानंतर कुटुंबीयांना संशय आला. तिला तातडीने खासगी रुग्णालयात नेण्यात आले. त्यानंतर पुढील उपचारासाठी शताब्दी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले.

मृत्यूपूर्वी महिलेने आशिषने आपल्याला शीतपेय दिले होते आणि ते प्यायल्यानंतरच आपली प्रकृती बिघडल्याचे कुटुंबीयांना सांगितल्याचे समोर आले आहे. डॉक्टरांनीही विषबाधेमुळे तिचा मृत्यू झाल्याचा संशय व्यक्त केला.

या प्रकरणाचा तपास सुरू केल्यानंतर आशिषने सुरुवातीला पोलिसांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांनी त्याची कसून चौकशी केल्यानंतर त्याने गुन्ह्याची कबुली दिल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. प्रेयसी दोन ते अडीच महिन्यांची गरोदर असताना आरोपीने शीतपेयात विषारी पदार्थ मिसळून ते तिला प्यायला दिल्याचे तपासात समोर आले आहे.

न्यायालयाने आरोपीला पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली असून पोलिसांकडून हत्येमागील नेमके कारण, विषारी पदार्थाची उपलब्धता आणि हत्येचा कट कधीपासून रचला होता, याचा तपास सुरू आहे.



### एटीएममध्ये फेविक्विकचा सापळा; ग्राहकांना लुटण्याचा डाव

कल्याण पूर्व परिसरात एटीएम ग्राहकांना लुटण्यासाठी चोरट्यांनी नवा फंडा शोधून काढल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. एटीएम मशीनमध्ये फेविक्विक लावून ग्राहकांचे एटीएम कार्ड अडकवायचे आणि त्यानंतर बनावट हेल्पलाइन क्रमांकाच्या माध्यमातून मदतीचे आमिष दाखवून ग्राहकांची फसवणूक करायची, अशी या टोळीची कार्यपद्धती असल्याचे समोर आले आहे.

या टोळीने एटीएमच्या कार्ड स्लॉटमध्ये फेविक्विक लावून ग्राहकांचे कार्ड अडकवण्याचा प्रयत्न केला. कार्ड बाहेर निघत नसल्याने ग्राहकांनी एटीएमवर दर्शविलेल्या किंवा चोरट्यांनी लावलेल्या बनावट हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधायचा. त्यानंतर मदतीच्या बहाण्याने ग्राहकांकडून गोपनीय माहिती मिळवून त्यांच्या खात्यातील पैसे लंपास करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे समोर आले आहे.

मात्र, नागरिकांच्या सतर्कतेमुळे या टोळीचा डाव उधळला गेला. संशयास्पद हालचाली लक्षात आल्यानंतर नागरिकांनी एका संशयिताला पकडून कोळशेवाडी पोलिसांच्या ताब्यात दिले. पोलिसांकडून त्याची चौकशी सुरू असून या प्रकारामागे आणखी किती जणांचा सहभाग आहे, तसेच या टोळीने यापूर्वी किती ग्राहकांना लक्ष्य केले आहे, याचा तपास केला जात आहे.


# कमी दिवसांत जास्त पैशांचे आमिष; दिल्ली-मुंबईतील तरुणींना देह व्यापारात ढकलले

**नागपूर । प्रतिनिधी**

नागपूरच्या यशोधरानगर परिसरात घरात लपूनछपून सुरू असलेल्या देह व्यापाराचा पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. संगमनगरातील एका घरावर पोलिसांनी बोगस ग्राहकाच्या माध्यमातून छापा टाकला असता एकाच खोलीत तीन तरुणी आढळून आल्या. मुंबई, दिल्लीसह इतर शहरांतील तरुणींना कमी दिवसांत जास्त पैसे कमावण्याचे आमिष दाखवून नागपुरात आणले जात असल्याची धक्कादायक माहिती प्राथमिक तपासातून समोर आली आहे.

या प्रकरणी पोलिसांनी ३० वर्षीय प्रवीण शालीकराम बिलसे उर्फ यादव याला अटक केली आहे. देह व्यापारासाठी स्वतःचे घर उपलब्ध करून दिल्याचा आरोप त्याच्यावर आहे. यशोधरानगर पोलिसांना संगमनगरातील एका घरात देह व्यापार सुरू असल्याची माहिती मिळाली होती. त्यानंतर पोलिसांनी खात्री करण्यासाठी बोगस ग्राहक पाठवला. माहितीची खातरजमा झाल्यानंतर पोलिसांनी २८ ऑगस्ट रोजी सायंकाळी सुमारे पाच वाजता संबंधित घरावर छापा टाकला. या कारवाईत घरात तीन तरुणी आढळून आल्या.

पोलिसांना घटनास्थळावरून १ लाख १८ हजार ८०० रुपयांची रोकडही मिळाली. आरोपी स्वतःच्या घराचा वापर देह व्यापारासाठी करत असल्याचे तपासात समोर आले आहे. याप्रकरणी संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीला अटक करण्यात आली आहे.



पोलिसांच्या प्राथमिक चौकशीत आणखी धक्कादायक माहिती समोर आली आहे. मुंबई आणि दिल्लीसह इतर शहरांतील तरुणींना कमी कालावधीत मोठ्या प्रमाणात पैसे कमावण्याचे आमिष दाखवले जात होते. त्यानंतर त्यांना वेगवेगळ्या शहरांतून नागपुरात आणण्यात येत होते. या तरुणींना सुरुवातीला एका हॉटेलमध्ये ठेवण्यात आल्याची माहितीही तपासात समोर आली आहे.

आरोपीने काही तरुणींसोबत काही महिन्यांचा करार केल्याचेही पोलिसांच्या निदर्शनास आले आहे. या कराराच्या आधारे त्यांना नागपुरात आणून देह व्यापारात ढकलण्यात आल्याचा संशय आहे.

या प्रकरणामागे मोठे जाळे कार्यरत आहे का, तरुणींना नागपुरात आणण्याचे काम कोण करत होते आणि या रॅकेटमध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे, याचा पोलिसांकडून तपास सुरू आहे. तरुणींना या व्यवसायात कोणी आणि कशा पद्धतीने ओढले, याचाही शोध घेतला जात आहे. तपास पुढे गेल्यानंतर या प्रकरणातील आणखी धक्कादायक बाबी समोर येण्याची शक्यता आहे.

# श्री संत जनार्दन महाराज संस्थानतर्फे ३१ ऑगस्ट रोजी भंडारा कार्यक्रम

**मंठा । प्रतिनिधी**

श्री संत जनार्दन महाराज संस्थान पेवा, कमिटी व पंचक्रोशीतील भाविकांच्या वतीने श्रावण मासानिमित्त सोमवार, ३१ ऑगस्ट २०२६ रोजी भंडारा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. नळडोह (पेवा), ता. मंठा, जि. जालना येथील श्री संत जनार्दन महाराज संस्थान येथे हा धार्मिक कार्यक्रम भक्तिमय वातावरणात पार पडणार आहे.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ८ वाजता महाआरतीने होणार असून, त्यानंतर सकाळी ८ ते ११ वाजेपर्यंत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या महाप्रसादाचा लाभ परिसरातील सर्व भाविक भक्तांनी घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. श्रावण महिन्याच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमामुळे परिसरात धार्मिक व भक्तिमय वातावरण निर्माण होणार आहे. श्री संत जनार्दन महाराजांच्या दर्शनासह महाप्रसादाचा लाभ घेण्यासाठी पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचे निमंत्रक म्हणून मा. श्री. सुरेश भूरा पवार, जालना जिल्हा सचिव, काँग्रेस यांची भूमिका आहे. संस्थान कमिटी व पंचक्रोशीतील कार्यकर्त्यांकडून कार्यक्रमाची तयारी करण्यात येत आहे.

# ' पोलीस' नावाच्या पाट्यांवर आता पोलिसांची नजर!

**जाफराबाद । प्रतिनिधी**

खासगी वाहनांवर 'पोलीस' असा उल्लेख असलेली पाटी लावून पोलिस विभागाशी संबंध असल्याचे भासविणाऱ्यांची आता खैर नाही. अशा वाहनांची तपासणी करून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करण्याचे निर्देश महाराष्ट्र राज्य महामार्ग पोलिस विभागाने दिले आहेत.

महामार्ग पोलिस विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ३१ जुलै २०२६ रोजी राज्यातील विविध पोलिस आयुक्त व पोलिस अधीक्षकांना पत्र पाठवून याबाबत आवश्यक त्या सूचना केल्या आहेत. पोलिस विभागाशी अधिकृत संबंध नसतानाही काही व्यक्ती खासगी वाहनांवर 'पोलीस' नावाच्या पाट्या लावून फिरत असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे. अशा पाट्यांमुळे वाहनधारक पोलिस विभागाशी संबंधित असल्याचा गैरसमज निर्माण होऊ शकतो. त्याचा वापर करून नागरिकांवर अनधिकृत प्रभाव किंवा धाक निर्माण केला जाण्याची शक्यता असल्याने अशा वाहनांवर विशेष लक्ष ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. 'पोलीस' नावाची पाटी किंवा पोलिस विभागाशी संबंधित असल्याचे दर्शविणारा फलक असलेले खासगी वाहन आढळल्यास ते थांबवून वाहनधारकाची चौकशी करण्याच्या सूचना आहेत. संबंधित व्यक्ती पोलिस विभागात कार्यरत आहे का, वाहन अधिकृत आहे का आणि अशी पाटी वापरण्यास सक्षम प्राधिकरणाची परवानगी आहे का, याची पडताळणी केली जाणार आहे. नियमांचे उल्लंघन आढळल्यास केवळ पाटी काढून न घेता संबंधित कायदे व मोटार वाहन नियमांनुसार आवश्यक ती कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच झालेल्या कारवाईचा अहवाल वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविण्याचेही आदेश आहेत. राज्यस्तरावरून स्पष्ट निर्देश जारी झाल्यानंतर आता त्याची स्थानिक पातळीवर अंमलबजावणी होण्याची अपेक्षा आहे. जाफ्राबाद शहर व परिसरात 'पोलीस' नावाच्या पाट्या लावून फिरणाऱ्या खासगी वाहनांची तपासणी कधी सुरू होणार, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.


# समृद्धी महामार्गावर गॅस गळतीने खळबळ; वाहतूक वळवली

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात समृद्धी महामार्गालगत असलेल्या गॅस पाईपलाईनमधून गळती झाल्याने मोठी खळबळ उडाली आहे. महामार्ग परिसरात मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरल्याने प्रवाशांना श्वास घेण्यास त्रास होऊ लागला. खबरदारीचा उपाय म्हणून नागपूरहून मुंबईच्या दिशेने जाणारी वाहतूक तात्पुरती बंद करण्यात आली असून, वाहतूक पर्यायी मार्गाने वळवण्यात आली आहे.

समृद्धी महामार्गावरील चॅनल क्रमांक ४५१.२ येथे गॅस पाईपलाईन लिक झाल्याचे समोर आले आहे. गॅस गळतीची माहिती मिळताच संबंधित यंत्रणांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. गळती थांबवून परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू करण्यात आले आहेत.

गॅस गळतीमुळे महामार्ग परिसरात मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरली. त्यामुळे वाहनचालक आणि प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. श्वास घेण्यास त्रास होत असल्याने महामार्गावर काही काळ वाहतूक कोंडीही झाली.



प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने नागपूरहून मुंबईच्या दिशेने जाणारी वाहतूक बंद करून लासूर हडस पिंपळगाव टोलनाक्यावरून वाहतूक वळवण्यात आली आहे. गॅस गळती पूर्णपणे थांबेपर्यंत या मार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांनी प्रशासनाच्या सूचनांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, मुंबई आणि नागपूरला जोडणारा समृद्धी महामार्ग सुमारे ७०१ किलोमीटर लांबीचा असून तो महाराष्ट्रातील प्रमुख दळणवळणाचा मार्ग आहे. सहा पदरी असलेल्या या महामार्गावर वाहनांना कमाल १२० किलोमीटर प्रतितास वेगाने प्रवास करण्याची परवानगी आहे. हा महामार्ग महाराष्ट्रातील १० प्रमुख जिल्ह्यांमधून आणि ३९० हून अधिक गावांमधून जातो.

गॅस गळती नेमकी कशामुळे झाली, गळतीचा परिसर किती प्रभावित झाला आहे आणि महामार्गावरील वाहतूक पुन्हा कधी सुरू करण्यात येणार, याबाबत संबंधित यंत्रणांकडून तपास सुरू आहे.


# यशोमती ठाकूर यांचा चित्रा वाघ यांच्या दौऱ्यावर निशाणा

**मुंबई । प्रतिनिधी**

शहरातील शासकीय स्त्री रुग्णालयात लागलेल्या भीषण आगीत तीन नवजात बालकांचा मृत्यू झाल्यानंतर राजकीय नेत्यांकडून रुग्णालयाची पाहणी सुरू आहे. भाजप आमदार चित्रा वाघ यांनी आज रुग्णालयाला भेट देत पाहणी केली. यावेळी त्यांनी रुग्णालयातील असुविधांवरून प्रशासनाला धारेवर धरत, 'तुमच्यामुळे सरकार बदनाम होत आहे,' असा संताप व्यक्त केला. त्यांच्या दौऱ्यानंतर काँग्रेस नेत्या तथा माजी मंत्री यशोमती ठाकूर यांनी रुग्णालयाला भेट देणाऱ्या नेत्यांवरच जोरदार टीका केली आहे.

यशोमती ठाकूर यांनी नेतेमंडळींच्या रुग्णालय दौऱ्याला 'पर्यटन' संबोधत सरकारवर निशाणा साधला. 'या सरकारची काय नाटकं सुरू आहेत हे समजत नाही. पर्यटनासारखे दवाखान्यात येत आहेत आणि तमाशा जास्त करीत आहेत. कुठेही सरकार काम करत नाही. सरकारचा धाक इथे राहिलेला नाही,' अशी संतप्त प्रतिक्रिया त्यांनी दिली.

पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे अद्याप रुग्णालयात पोहोचले नसल्याचे सांगत ठाकूर यांनी त्यांच्यावरही टीका केली. 'त्यांचा पाणीपुरी खाण्याचा चित्रफितीतील प्रकार समोर येतो. हनुमान गढीला १२१ कोटी रुपये दिले, मात्र नऊ कोटी रुपये जिल्हा स्त्री रुग्णालयाला दिले नाहीत,' असा आरोप त्यांनी केला. 'इथे येऊन उगाच नाटकं आणि आरडाओरडा बंद करा. रोज कोणी चित्रपटातील नायक-नायिकेसारखे, तर कोणी लोकप्रतिनिधी येणार आणि सरकार काम करत असल्याचे सांगणार. मात्र, सरकारचे अमरावतीकडे दुर्लक्ष आहे, हीच वास्तविकता आहे,' असेही यशोमती ठाकूर यांनी म्हटले.





दरम्यान, यापूर्वी भाजप आमदार चित्रा वाघ यांनी रुग्णालयाला भेट देऊन आगीच्या दुर्घटनेची माहिती घेतली. त्यांनी प्रथम जिल्हाधिकाऱ्यांशी, त्यानंतर वैद्यकीय अधिकाऱ्यांशी चर्चा केली. रुग्णालयाच्या अग्निसुरक्षेच्या पाहणीबाबत प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या वेगवेगळ्या दाव्यांवरून त्यांनी प्रश्न उपस्थित केले.

भंडारा येथील दुर्घटनेनंतर राज्यातील रुग्णालयांचे अग्निसुरक्षा परीक्षण करण्याचे आदेश देण्यात आले होते. २५ जून रोजी पहिले पत्र देण्यात आले. त्यानंतर ३० जून आणि २२ ऑगस्ट रोजी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी पाहणी केल्याचा दावा केला. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी रुग्णालयात कोणीही पाहणीसाठी आले नसल्याचे सांगितल्याने चित्रा वाघ यांनी प्रशासनाच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

'सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी म्हणतात की रुग्णालयातील अधिकारी पाहणीसाठी सहकार्य करत नाहीत, तर वैद्यकीय अधिकारी कोणी आलेच नसल्याचे सांगतात. जिल्हाधिकाऱ्यांनीही कोणीतरी खोटे बोलत असल्याचे मान्य केले आहे. त्यामुळे नेमके खोटे कोण बोलत आहे, हे समजत नाही,' असे चित्रा वाघ यांनी म्हटले.

या दुर्घटनेप्रकरणी शासनाने चौकशी समिती नेमली असून, दोषी कोण आहे हे त्यातून स्पष्ट होईल. मात्र, या प्रकरणात पोलीस चौकशीही आवश्यक असल्याचे चित्रा वाघ यांनी सांगितले. तीन नवजात बालकांचा जीव गेल्याने या प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करून त्यांना निलंबित केले पाहिजे, अशी मागणीही त्यांनी केली.

## संक्षिप्त

### जातपडताळणी समित्यांच्या अस्तित्वावरून विखे पाटील लक्ष्यावर



**जालना । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यातील जातपडताळणी समित्यांच्या वैधानिक अस्तित्वाच्या प्रश्नावरून मराठा आरक्षण विषयक मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष तथा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावर सकल मराठा समाज आणि मराठा क्रांती मोर्चाचे राज्य समन्वयक डॉ. संजय लाखेपाटील यांनी जोरदार टीका केली आहे. देशभर जातपडताळणी समित्या अस्तित्वात नसून त्या केवळ महाराष्ट्रातच असल्याने त्यांची आवश्यकता नाही आणि त्या बरखास्त कराव्यात, असा सल्ला विखे पाटील यांनी दिल्याचे समोर आल्याचा दावा डॉ. लाखेपाटील यांनी केला आहे. असा सल्ला देणे धक्कादायक, असंविधानिक आणि बेकायदेशीर असून, वैधानिक व कायदेशीर तरतुदींबाबतचे घोर अज्ञान यातून दिसून येते, असा आरोप त्यांनी केला.

डॉ. लाखेपाटील यांनी सांगितले की, जातपडताळणी समित्या किंवा जात छाननी समित्यांची संकल्पना केवळ महाराष्ट्रापुरती मर्यादित नाही. कुमारी माधुरी पाटील विरुद्ध अतिरिक्त आयुक्त, आदिवासी विकास (उर्ळीळश्र -ींशिरश्र छे. ५८५४`ष १९९४) या ऐतिहासिक प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने जात व जमातीच्या प्रमाणपत्रांच्या पडताळणीसाठी स्वतंत्र छाननी समित्यांची व्यवस्था करण्याबाबत महत्त्वपूर्ण निर्देश दिले आहेत. या निर्णयानुसार जात प्रमाणपत्रांची छाननी, पडताळणीची प्रक्रिया आणि समित्यांची रचना याबाबतची व्यवस्था करण्यात आली असल्याचे त्यांनी नमूद केले. जात आणि जमातीच्या प्रमाणपत्रांमध्ये होणारे गैरप्रकार रोखणे, खोटी प्रमाणपत्रे सादर करून आरक्षणाचा लाभ घेणाऱ्यांना आळा घालणे आणि आरक्षणाचा लाभ खऱ्या पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविणे, हा अशा यंत्रणेचा प्रमुख उद्देश असल्याचे डॉ. लाखेपाटील यांनी स्पष्ट केले. त्यामुळे जातपडताळणी समित्यांची आवश्यकता नाही, असा दावा करणे म्हणजे या संपूर्ण कायदेशीर प्रक्रियेच्या उद्देशालाच हरताळ फासण्यासारखे असल्याचे त्यांनी म्हटले.

सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये जात व जमातीच्या प्रमाणपत्रांची पडताळणी करण्यासाठी आवश्यक यंत्रणा कार्यान्वित असल्याचा दावा डॉ. लाखेपाटील यांनी केला. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांच्या पार्श्वभूमीवर जातपडताळणीची प्रक्रिया राबविणे ही राज्य सरकारांची वैधानिक व कायदेशीर जबाबदारी आहे. त्यामुळे महाराष्ट्र या प्रक्रियेला अपवाद ठरू शकत नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. जातपडताळणी समित्यांचे अस्तित्व संपुष्टात आणण्याचा कोणताही प्रयत्न झाला, तर त्याला कायदेशीर आव्हान निर्माण होऊ शकते, असा इशाराही डॉ. लाखेपाटील यांनी दिला. राज्यातील केवळ मराठा समाजच नव्हे, तर विविध जाती-जमातींच्या नागरिकांच्या आरक्षणाच्या हक्काशी हा विषय संबंधित असल्याचे त्यांनी म्हटले. मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर राज्यात आंदोलनाची पार्श्वभूमी असताना श्री विखेपाटील यांच्या अशा सल्ल्यामुळे मराठा समाजातील तरुणांमध्ये तसेच इतर जाती-जमातींच्या समाजघटकांमध्ये संभ्रम आणि असंतोष निर्माण होऊ शकतो. परिणामी सामाजिक तेढ वाढण्याची तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही, असा दावा डॉ. लाखेपाटील यांनी केला. त्यामुळे या कथित वक्तव्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच राज्यपालांनी गंभीर दखल घ्यावी. विखे पाटील यांना केवळ मराठा आरक्षण विषयक मंत्रिमंडळ उपसमितीच्या अध्यक्षपदावरूनच नव्हे, तर मंत्रिमंडळातूनही हटवावे, अशी आग्रही मागणी आपण केली असल्याचे डॉ. लाखेपाटील यांनी सांगितले.

# माळीपुरात भटक्या कुत्र्यांचा हैदोस; नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

## जामा मशीद, अण्णाभाऊ साठे पुतळा परिसरात रात्री कुत्र्यांची दहशत





**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील माळीपुरा परिसरात भटक्या कुत्र्यांचा हैदोस वाढला असून नागरिक या कुत्र्यांच्या त्रासाला अक्षरशः वैतागले आहेत. रस्त्यावर मोठ्या संख्येने फिरणाऱ्या कुत्र्यांमुळे लहान मुले, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच रात्रीच्या वेळी ये-जा करणाऱ्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

माळीपुरा परिसरातील जामा मशीद परिसर तसेच अण्णाभाऊ साठे पुतळा परिसरातील अनेक पथदिवे बंद असल्याने नागरिकांच्या अडचणीत आणखी भर पडली आहे. अंधाराचा फायदा घेत भटक्या कुत्र्यांचे टोळके रस्त्यावर फिरत असल्याने रात्रीच्या वेळी या भागातून जाणे नागरिकांसाठी धोकादायक ठरत आहे.

शहरात यापूर्वीही भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात लहान मुले गंभीर जखमी झाल्याच्या घटना घडल्या आहेत.

त्यामुळे माळीपुरा परिसरातील नागरिकांमध्येही भीती वाढली आहे. कुत्र्यांच्या समस्येबाबत नागरिकांनी वेळोवेळी महानगरपालिका प्रशासन तसेच संबंधित नगरसेवकांकडे तक्रारी करूनही अद्याप ठोस उपाययोजना झालेली नसल्याची नागरिकांची तक्रार आहे.

काही महिन्यांपूर्वी भटक्या कुत्र्यांना पकडण्यासाठी महानगरपालिकेने मोठ्या प्रमाणात मोहीम राबवून काही कुत्रे पकडले होते. मात्र त्यानंतर पुन्हा परिसरात भटक्या कुत्र्यांची संख्या वाढल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे केवळ काही दिवसांची मोहीम न राबवता कायमस्वरूपी आणि प्रभावी उपाययोजना करण्याची गरज नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

भटक्या कुत्र्यांसोबतच माळीपुरा परिसरातील बंद पथदिव्यांची समस्याही तातडीने सोडवावी, अशी मागणी होत आहे. रस्त्यावरील अंधार आणि कुत्र्यांची दहशत यामुळे रात्रीच्या वेळी नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

महानगरपालिका प्रशासनाने तातडीने माळीपुरा परिसरातील भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करावा तसेच बंद असलेले पथदिवे पूर्ववत सुरू करावेत, अशी जोरदार मागणी परिसरातील नागरिकांच्या वतीने करण्यात येत आहे.

## संचालक पाटील वाकडे यांच्याकडून विद्यार्थ्यांनी जाणून घेतले रोपवाटिकेतील व्यवस्थापनाचे बारकावे



**जाफराबाद । प्रतिनिधी**

प्रत्यक्ष अनुभवातून मिळणारे ज्ञान हेच सर्वश्रेष्ठ ज्ञान या उक्तीचा प्रत्यय देत पी.एम.श्री. जिल्हा परिषद प्रशाला, जाफराबाद येथील इयत्ता नववी व दहावीच्या मल्टिस्कील विषयाच्या विद्यार्थ्यांनी शहरातील शिवालय हायटेक नर्सरीला क्षेत्रभेट दिली. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी भाजीपाला रोपवाटिकेतील विविध प्रक्रिया प्रत्यक्ष पाहून कृषीविषयक माहिती जाणून घेतली. क्षेत्रभेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या भाजीपाल्याच्या रोपांची माहिती घेतली. बियाणे पेरणीपासून रोपांची उगवण व वाढ, पाणी व्यवस्थापन, सेंद्रिय खतांचा वापर, रोपांची निगा आणि योग्य पद्धतीने रोपे तयार करण्याची प्रक्रिया यांचे विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष निरीक्षण केले.

शिवालय हायटेक नर्सरीचे संचालक प्रवीण पाटील वाकडे यांनी विद्यार्थ्यांना रोपवाटिका व्यवस्थापन, विविध भाजीपाला पिकांसाठी आवश्यक रोपे तसेच रोपांची योग्य काळजी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी उत्सुकतेने प्रश्न विचारून कृषी क्षेत्रातील विविध बाबी समजून घेतल्या. या क्षेत्रभेटीमुळे विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न मिळता कृषीविषयक प्रत्यक्ष अनुभव, निसर्गप्रेम, श्रमाचे महत्त्व आणि आधुनिक शेती तंत्रज्ञानाची माहिती मिळण्यास मदत झाली. प्रत्यक्ष अनुभवातून विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडल्याने ही क्षेत्रभेट त्यांच्या शैक्षणिक वाटचालीसाठी उपयुक्त ठरली. यावेळी शाळेचे माजी मुख्याध्यापक उमेश दुनगहु ओम देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.

## विक्रोळीतील बंद दुकानात आढळला मृतदेह



**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबई उपनगरातील विक्रोळी परिसरातील कन्नमवार नगर येथील स्वयंभू गणेश बाजारातील बंद दुकानात एका महिलेचा कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. घटनेची माहिती मिळताच विक्रोळी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेह ताब्यात घेतला. महिलेची हत्या झाली आहे की तिच्या मृत्यूमागे अन्य काही कारण आहे, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे.

प्राथमिक माहितीनुसार, विक्रोळी पोलीस ठाण्यात २६ ऑगस्ट रोजी एक महिला बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल करण्यात आली होती. सुनीता गौतम मोरे (वय ३०) असे या महिलेचे नाव आहे. त्या विक्रोळी पूर्व परिसरातील टागोर नगर येथील रहिवासी असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

दरम्यान, सुनीता मोरे यांचा मृतदेह विकास महाविद्यालयाच्या पाठीमागील बाजूस असलेल्या मच्छी बाजारातील गाळा क्रमांक ५० मध्ये आढळून आला. बंद गाळ्यात महिलेचा मृतदेह कुजलेल्या अवस्थेत आढळल्याने परिसरात एकच खळबळ उडाली.

घटनेची माहिती मिळताच विक्रोळी पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन पुढील कार्यवाही सुरू केली आहे. मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

महिलेचा मृत्यू नेमका कशामुळे झाला, याचा तपास करण्यात येत असून हत्या किंवा अन्य कोणते कारण आहे, या सर्व शक्यता तपासल्या जात आहेत. घटनास्थळावरील परिस्थिती आणि उपलब्ध पुराव्यांच्या आधारे पोलिसांकडून तपास सुरू आहे. या प्रकरणात पुढील तपासानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे.

# हलाखीच्या परिस्थितीवर मात करत कैलास पवार यांची शिक्षकपदी निवड



**जालना । प्रतिनिधी**

भोकरदन तालुक्यातील जवखेडा बुद्रुक येथील कैलास बाळा पवार यांनी अत्यंत हलाखीच्या परिस्थितीवर मात करत शिक्षक होण्याचे स्वप्न साकार केले आहे. पवित्र पोर्टलमार्फत घेण्यात आलेल्या 'अभियोग्यता व बुद्धिमापन चाचणी-२०२५' मध्ये त्यांची नाशिक जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागात इयत्ता ६ वी ते ८ वीच्या गणित व विज्ञान विषयाच्या शिक्षकपदी निवड झाली आहे.

कैलास पवार यांनी प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण पूर्ण करत २०२४ मध्ये इ.डल. व इ.एव. पदवी प्राप्त केली. शिक्षक होण्यासाठी आवश्यक असलेली उढएढ पात्रता परीक्षा देखील त्यांनी उत्तीर्ण केली. त्यानंतर शिक्षक भरतीसाठी आवश्यक असलेल्या पवित्र पोर्टलच्या अभियोग्यता व बुद्धिमापन चाचणी-२०२५ मध्ये त्यांनी यश मिळवले.

२७ ऑगस्ट रोजी जाहीर झालेल्या निवड प्रक्रियेत कैलास पवार यांची नाशिक जिल्हा परिषद अंतर्गत इयत्ता ६ वी ते ८ वीच्या विद्यार्थ्यांना गणित व विज्ञान विषय शिकवण्यासाठी शिक्षक म्हणून निवड झाली. त्यांच्या या यशामुळे जवखेडा बुद्रुकसह भोकरदन तालुक्यात आनंदाचे वातावरण आहे.

विशेष म्हणजे, कैलास पवार यांच्या कुटुंबातील ही यशाची दुसरी मोठी पायरी आहे. २०२३ मध्ये त्यांचे मोठे बंधू चझझउ परीक्षेद्वारे मंत्रालयात लिपिक पदावर निवडले गेले आहेत. दोन्ही भावांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत मिळवलेल्या या यशाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

कैलास पवार यांच्या मेहनतीचे आणि जिद्दीचे कौतुक करत कुटुंबीय, मित्रपरिवार, शिक्षकवर्ग तसेच ग्रामस्थांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

त्यांच्या यशामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसमोरही मेहनत, जिद्द आणि सातत्याच्या जोरावर मोठे यश मिळवता येते, असा प्रेरणादायी आदर्श निर्माण झाला आहे.

## वडीगोद्रीत मराठा आंदोलकांचा रास्ता रोकोचा प्रयत्न; महामार्गावरील वाहतूक काही काळ रोखली



**जालना । प्रतिनिधी**

आंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे-पाटील यांच्या उपोषणाला आजपासून सुरुवात झाल्यानंतर त्याच्या समर्थनार्थ जालना जिल्ह्यातील वडीगोद्री येथे मराठा आंदोलकांनी धुळे-सोलापूर महामार्गावर रास्ता रोको करण्याचा प्रयत्न केला. आंदोलकांनी महामार्गावर वाहने रोखून धरल्याने काही काळ वाहतूक विस्कळीत झाली.

मनोज जरांगे-पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा दर्शवण्यासाठी मोठ्या संख्येने मराठा आंदोलक वडीगोद्री येथे एकत्र आले होते. यावेळी आंदोलकांनी महामार्गावर ठिय्या देत वाहनांची ये-जा रोखण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे महामार्गावर काही काळ वाहनांच्या रांगा लागल्या.

दरम्यान, परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत आंदोलकांशी चर्चा केली. आंतरवाली सराटीच्या सरपंचांनीही मध्यस्थी करत आंदोलकांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. पोलिस आणि सरपंचांच्या हस्तक्षेपानंतर आंदोलकांनी रास्ता रोको मागे घेतला.

आंदोलनादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिसांकडून परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवण्यात आले. रास्ता रोको मागे घेतल्यानंतर महामार्गावरील वाहतूक पुन्हा सुरळीत करण्यात आली.

मनोज जरांगे यांच्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी मराठा समाजाच्या आंदोलनाची धग आता जिल्ह्यातही जाणवू लागली असून, पुढील काळात आंदोलनाची दिशा काय असेल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## अंतरवालीत येताना दुर्दैवी घटना; बीडच्या आंदोलकाचा हृदयविकाराच्या धक्क्याने मृत्यू



**जालना । प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी आजपासून जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे निर्णायक आंदोलनाला सुरुवात केली आहे.

या आंदोलनात सहभागी होण्यासाठी राज्यभरातील मराठा बांधवांना अंतरवाली सराटीत येण्याचे आवाहन करण्यात आले आहे. त्यानुसार मोठ्या संख्येने मराठा बांधव अंतरवालीकडे रवाना झाले आहेत. दरम्यान, अंतरवालीकडे जात असताना बीड जिल्ह्यातील एका आंदोलकाचा हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली.

सुग्रीव बापू शिंदे असे मृत आंदोलकाचे नाव असून ते केज तालुक्यातील नांदूरघाट येथील रहिवासी होते. मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनात सहभागी होण्यासाठी सुग्रीव शिंदे हे आपल्या सहकाऱ्यांसह अंतरवालीकडे निघाले होते. त्यांचे वाहन गेवराईजवळ आले असताना त्यांना अचानक हृदयविकाराचा तीव्र धक्का आला. त्यातच त्यांचा मृत्यू झाल्याची माहिती त्यांच्या नातेवाईकांनी दिली आहे. या घटनेमुळे मराठा समाजात हळहळ व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, बीड जिल्ह्यातील नवगण राजुरी येथून साहित्य आणि आवश्यक वस्तू घेऊन मोठ्या संख्येने मराठा बांधव अंतरवाली सराटीकडे रवाना झाले आहेत. आंदोलनासाठी संपूर्ण तयारीनिशी निघालेल्या या आंदोलकांकडून पुढील काळात मुंबईकडेही जाण्याची तयारी असल्याचे सांगण्यात येत आहे.

मनोज जरांगे पाटील यांचे आंदोलन सुरू असेपर्यंत अंतरवाली सराटीतच थांबण्याची तयारी असल्याचे अनेक आंदोलकांनी सांगितले. त्यामुळे पुढील काळात अंतरवाली सराटीत मराठा समाजाच्या आंदोलकांची मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे.

# माजी राज्यमंत्री तथा आमदार अर्जुनराव खोतकरांकडून भूमी पवारचे कौतुक





**जालना । प्रतिनिधी**

जालना येथील कु. भूमी विकी पवार हिने आपल्या उत्कृष्ट क्रीडा कौशल्याची चमक दाखवत १७ व्या कुडो राज्यस्तरीय व ७ व्या मेयर्स कप स्पर्धेत दोन रौप्यपदकांची कमाई केली आहे. तिच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल माजी राज्यमंत्री तथा आमदार अर्जुनराव खोतकर यांच्याकडून भूमी पवार हिचे कौतुक व गुणगौरव करण्यात आला.भूमी पवार हिने कुडो या क्रीडा प्रकारात उल्लेखनीय कामगिरी करत दोन रौप्यपदके पटकावून जालना शहराचे नाव उज्ज्वल केले आहे. तिच्या या यशाबद्दल माजी राज्यमंत्री तथा आमदार अर्जुनराव खोतकर यांनी तिचे अभिनंदन करून तिच्या मेहनतीचे, जिद्दीचे आणि क्रीडा क्षेत्रातील कामगिरीचे कौतुक केले.यावेळी युवा सेना महाराष्ट्र राज्य सचिव अभिमन्यू दादा खोतकर, नगरसेविका दर्शना ताई खोतकर (झोल), आदरणीय सीमाताई अर्जुनराव खोतकर, विरोधी पक्षनेते नगरसेवक कमलेश खरे, विकी पवार, रविकांत जगधने, संजय भालेराव आदींनी भूमी पवारचे अभिनंदन केले.

खोतकर परिवाराच्या वतीने भूमी पवार हिला पुढील क्रीडा वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. भविष्यात तिने राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर उत्कृष्ट कामगिरी करून जालना जिल्ह्याचे नाव देशभरात उज्ज्वल करावे, असा आशीर्वादही यावेळी देण्यात आला.भूमी पवार हिने मिळविलेल्या या यशामुळे तिच्या कुटुंबीयांसह मित्रपरिवार व क्रीडाप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण आहे. तिच्या मेहनतीचे आणि जिद्दीचे सर्व स्तरातून कौतुक होत असून, आगामी काळात ती आणखी मोठे यश संपादन करेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक ज्योती मधुकर आडेकर यांनी डी.बी. कॉर्प लि. दिव्य मराठी, डी. १८१, शेंद्रा एम.आय.डी.सी. छत्रपती संभाजीनगर(औरंगाबाद) - ४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून, कार्यालय दैनिक महिला संवाद, सी-२०३, अनंत पार्क, काळेवाडी रोड, राहटनी, धनगर बाबा मंदीराजवळ, पुणे शहर, पुणे - ४११०१७(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. संपादक : ज्योती मधुकर आडेकर, मो. नं. ९१६८५६७१११, कार्यकारी संपादक : विद्या जाधव, उप संपादक : सौ. सुनंदा राजु निक्रड, मेल आयडी - mahilasanvad11@gmail.com, पीआरजीआय नोंदणी क्रमांक - **MHMAR/25/A1224**

Printer, Publisher & Owner Jyoti Madhukar Adekar, Printed At D. B. Corp Ltd., Divya Marathi, D 181, SHENDRA MIIDC Chatrapati Sambhaji Nagar (AURANGABAD) - 431003(Maharashtra), And Published At Office Daily Mahila Sanvad C-203, Anant Park, Kalevadi Road, Rahatni, Near Dhangar Baba Mandir, Pune City, Pune -411017 (Maharashtra), Editor : Jyoti Madhukar Adekar, Mob. No. 9168567111, Executive Editor : Vidya Jadhav, Deputy Editor : Sau. Sunanda Raju Nikrad, E-Mail : mahilasanvad11@gmail.com **PRGI Reg. No. - MHMAR/25/A1224**